आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२० जुलै २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या प्रणालीत झालेला तांत्रिक बिघाड हळूहळू सोडवण्यात येत असल्याची क्राउडस्ट्राइकच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची माहिती/ देशातली विमानतळांवरची एअरलाईन कार्यप्रणाली पूर्ववत

- जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनाचं नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार उद्घाटन

- केंद्रिय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांचा राजीनामा

**आणि**

- बांगलादेशात हिंसक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशभरात संचारबंदी लागू

**<><><><><>**

मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या प्रणालीत काल झालेला तांत्रिक बिघाड हळूहळू सोडवण्यात येत आहे, मात्र, सर्व यंत्रणा सुरळीत होण्यास आणखी काही वेळ लागेल, असं मायक्रोसॉफ्टची सहयोगी कंपनी क्राउडस्ट्राइकच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या प्रणालीत काल तांत्रिक बिघाड झाला आणि जगभरातले व्यवहार ठप्प झाले. या तांत्रिक बिघाडाचा अर्थात आऊटेजचा जगभरातल्या कोट्यवधी वापरकर्त्यांना तसंच बँकिंग सेवा, रुग्णालयं आणि विमान वाहतूक यंत्रणेला सर्वात जास्त फटका बसला. देशातल्याही अनेक विमान कंपन्यांना विमानतळांवर मॅन्युअल चेक-इन आणि बोर्डिंग प्रक्रियेचा अवलंब करावा लागला.

मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सर्व तज्ज्ञ काम पुन्हा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत असून ग्राहकांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असं मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्य नारायण नडेला यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, जागतिक आउटेजबाबत सरकार मायक्रोसॉफ्टशी संपर्कात असून या बिघाडामागचं कारण सापडल्याची माहिती, केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. तसंच राष्ट्रीय माहिती केंद्राच्या नेटवर्कवर या बिघाडाचा परिणाम झाला नसल्याचं वैष्णव यांनी नमूद केलं आहे.

या पार्श्वभूमीवर विमानतळांवरची एअरलाईन कार्यप्रणाली पूर्ववत झाली असून हवाई वाहतूक सुरळीत सुरू झाल्याचं नागरी उड्डाण मंत्रालयानं आज स्पष्ट केलं आहे. सरकारचं विमानतळावरच्या कामकाजावर पूर्ण लक्ष असून विमान कंपन्यांसह प्रवाशांचं नियोजन आणि परतावा यावर देखील पूर्ण नियंत्रण आहे, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

संसदेच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, या दृष्टीनं या बैठकीत चर्चा होईल. संसदेचं हे अधिवेशन १२ ऑगस्टपर्यंत चालेल. केंद्रीय अर्थसंकल्प २३ जुलै रोजी सादर होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातला हा पहिलाच अर्थसंकल्प आहे.

**<><><><><>**

जागतिक वारसा समितीचं ४६ वं अधिवेशन उद्यापासून नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचं उद्घाटन होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यात युनेस्कोच्या महासंचालक आँड्रे अझौले आणि युनेस्को जागतिक वारसा सचिवालयातले वारिष्ट अधिकारी तसंच विविध देशातले सांस्कृतिक मंत्री, राजदूत आणि डोमेन तज्ञ उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनाच्या माध्यमातून भारताचा अद्वितीय सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा जगासमोर येईल, असं केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री राजेंद्र सिंह शेखावत यांनी म्हटलं आहे. जागतिक वारसा समितीवर भारताची चार वर्षांसाठी निवड झाली असून देशातल्या एकूण ४२ ऐतिहासिक वास्तूंचा जागतिक वारसा यादीत समावेश आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्त्री आणि भूतानचे परराष्ट्र व्यवहार सचिव आउम पेमा छोद्जोन यांच्या सहअध्यक्षतेखाली तिसरी भारत-भूतान विकास सहकार्य चर्चा आज भूतानमध्ये झाली. या बैठकीत १३ व्या पंचवार्षिक योजना कालावधी अंतर्गत विकास भागीदारीची विविध क्षेत्रे, त्यातलं सहकार्य आणि कार्यान्वयनाचे मार्ग, याबाबत चर्चा झाली. परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्त्री दोन दिवसाच्या भूतान दौऱ्यावर असून काल त्यांनी भूतानचे प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे यांची भेट घेतली.

**<><><><><>**

विविध उपक्रमांच्या माध्यमातून सरकारी तंत्रशिक्षण क्षेत्राचा विकास करण्यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं केंद्रीय मंत्री अश्विनी

वैष्णव यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासोबत काल मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सरकारी तंत्र आणि अभियांत्रिकी संस्थांनी नव्या कल्पना आणि प्रस्ताव सादर करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे उभारण्यात येणाऱ्या आयआयटी ३डी पेंटिंग, रोबोटिक्स आणि आटोमेशन उत्कृष्टता केंद्राविषयीचं सादरीकरण यावेळी करण्यात आले.

<><><><><>

UPSC अर्थात केंद्रिय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आपला राजीनामा त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला आहे. त्यांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार होता, पण आपल्या वैयक्तिक कारणांसाठी त्यांनी राजीनामा देत असल्याचं सांगितलं. सोनी २०१७ पासून केंद्रिय लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहत होते. १६ मे २०२३ रोजी त्यांनी आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला होता. केंद्रिय लोकसेवा आयोगाचे सदस्य होण्याआधी सोनी यांनी दोन विद्यापीठांचे कुलगुरू म्हणून काम केलं होतं.

<><><><><>

केंद्रिय गृहमंत्री अमित शाह आज झारखंडची राजधानी रांचीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भाजपाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीला ते आज संबोधित करतील, तसंच पक्षाच्या राज्यातल्या महत्वाच्या नेत्यांशी आणि कार्यकर्त्यांशी ते चर्चा करणार आहेत.

<><><><><>

रांचीच्या राजेंद्र वैद्यकीय विज्ञान संस्थेनं एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाला शिकणाऱ्या सुरभी कुमारीला नीट-यूजी प्रवेशपरीक्षा पेपरफुटी प्रकरणी निलंबित केलं आहे. तसंच परीक्षेच्या काळातल्या सुरभीच्या कृत्यांची चौकशी करण्यासाठी पाच सदस्यांच्या समितीचीही स्थापना संस्थेनं केली आहे. केंद्रीय अन्वेषण संस्थेनं काल सुरभीला तिच्या वसतिगृहातून अटक केली होती. त्यानंतर पुढच्या चौकशीसाठी तिची रवानगी तीन दिवसांच्या सीबीआय कोठडीत करण्यात आली. चौकशीदरम्यान तिनं पेपरफुटीत आपला सहभाग असल्याची कबुली दिली आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या 'नीट-यूजी' परीक्षेच्या केंद्रनिहाय निकालाची माहिती आज एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं आपल्या संकेतस्थळावर जाहीर केली. एनटीएनं आज दुपारी १२ वाजेपर्यंत शहर आणि केंद्रनिहाय निकालाची माहिती संकेतस्थळावर जाहीर करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले होते.

**<><><><><>**

राखी पौर्णिमेसाठी आपल्या प्रियजनांना वेळेवर राख्या मिळाव्यात या दृष्टीनं ३१ जुलै पर्यंत राख्या पाठवण्याचं आवाहन भारतीय टपाल खात्यानं नागरिकांना केलं आहे. राख्यांचं संभाव्य नुकसान टाळण्यासाठी राख्या असलेली आपली पाकिटे सुरक्षितपणे बंद करणं आवश्यक असून पाकिटावर योग्य पिनकोडसह योग्य पत्ता लिहिणं गरजेचं आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात गेल्या काही दिवसांपासून पसरलेल्या हिंसक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशभरात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तसंच लष्कर

तैनात करण्यात आलं आहे. बांगलादेशातल्या सरकारी नोकऱ्यांमधल्या आरक्षणाच्या धोरणात सुधारणा करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी काही दिवसांपूर्वी आंदोलन पुकारलं होतं. त्याला हिंसक वळण लागून विद्यार्थी आणि पोलिसांच्यात झालेल्या संघर्षात आत्तापर्यंत १०५ जण ठार झाले आहेत.

<><><><><>

हैतीच्या उत्तर किनाऱ्याजवळ एका जहाजाला लागलेल्या आगीत किमान ४० स्थलांतरितांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या प्रवासात किमान ८० जण प्रवास करत होते. हैतीहून दीडशे मैलावर असलेल्या टर्क्स अँड कॅकॉस बेटाच्या दिशेनं हे जहाज निघालं होतं.

<><><><><>

महाराष्ट्रात आज मुसळधार पाऊस पडत असून हवामान विभागानं रत्नागिरी आणि चंद्रपूर जिल्ह्यासाठी आज रेड अलर्ट जारी केला आहे. विदर्भात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस सुरू आहे. नागपूर, चंद्रपूर, अमरावतीमध्ये जोरदार पाऊस सुरू असून अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचलं होतं. त्याचा परिणाम वाहतुकीवर झाल्यानं चाकरमान्यांची तारांबळ उडाली.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं आज गुजरात, कोकण, गोवा, कर्नाटक किनारपट्टी आणि दक्षिण कर्नाटकच्या अंतर्गत भागात मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा दिला आहे. केरळ, तेलंगण, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, ओडिशा, विदर्भ, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची स्थिती आज कायम राहील. मध्य महाराष्ट्रातही पुढले चार दिवस मुसळधार पावसाचा अंदाज

वर्तवण्यात आला आहे.  देशाच्या इतर भागातही जोरदार वृष्टीचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**